म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. 3270

श्री महागणपती

IRBK-0103270
IRBK-0103270

3200

# श्री महागणपती

ग्रं. स. ठाणे
बाल-वाङ्मय.
४९२



IRBK-0103270
IRBK-0103270

त्र्यं. ग. बापट,

श्री

# महागणपती

: लेखक :

त्र्यं. ग. बापट,

बी. ए.; बी. टी.

ऑसि० सुपरिंटेंडंट, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचें मुलांचें हायस्कूल,

पुणें नं. २.

★

द. र. कोपर्डेकर पुणें २.

किंमत ६ आणे.

# आ भा र

प्रौढ वाचकासाठीं मी लिहिलेल्या श्रीमहागणपतीच्या ऐतिहासिक कथेची ही विद्यार्थ्यांसाठीं सोपी सुटसुटित आवृत्ति तयार करण्याच्या आणि छापून प्रकाशित करण्याच्या कामीं मला माझे स्नेही श्री. शं. रा. देवळे, श्री. रं. म. जोशी–निर्मळ, श्री. ल. पा. सातपुते, आणि प्रकाशक श्री. दयार्णव कोपर्डेकर यांचें बहुमोल साहाय्य झालें. या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद. प्रौढ वाचकांप्रमाणेंच माझ्या बालमित्रांना ही कथा खासच आवडेल.

पुणें, गणेशचतुर्थी शके १८७२
१५ सप्टेंबर १९५०

त्र्यं. ग. बापट


मुद्रक
गं. शं. दाते,
६६६ सदाशिव,
पुणें २.

आवृत्ति पहिली.
गणेशचतुर्थी, शके १८७२
1950

प्रकाशक
द. र. कोपर्डेकर,
५२९ सदाशिव
पुणें २.

# महा गणपती

सुमारें पांच सात हजार वर्षांपूर्वींची गोष्ट, पाताळांतील रत्नपुरींत एक राजा होता. त्याचें नांव काशीराजा असें होतें. कश्यप ऋषि हे काशीराजाचे गुरुजी होते.

कश्यपऋषि हिमालयाच्या पायथ्याशीं राहात असत. ते फार विद्वान होते. त्यांच्या गुरुकुलांत एकवीसशें बटू वेदविद्या शिकत.

कश्यपाच्या पत्नीचें नांव अदिति होतें. अदिति ही पतिव्रता स्त्री होती. ती सूर्य–देवाची भक्ति करीत असे.

अदितीला फारा दिवसांनी मुलगा झाला. तिनें त्याचें नांव "विनायक" असें ठेविलें. विनायकाचा जन्म झाला तेव्हां सर्वांना फार आनंद झाला. विनायक रूपानें चांगला नव्हता. सावळा रंग, बारीक डोळे, हत्तीसारखे कपाळ, असें त्याचें रूप होतें. विनायक असा कुरूप होता तरीही तो सर्वांना आवडला.

आज विनायक–बाळाचें बारसें होतें. आश्रमांतील स्त्रिया जमल्या. त्यांनीं बाळास दूर्वांकुरांचा पाळणा तयार केला. पाळण्यांत बाळ निजविला आणि गोड गाणीं गाइलीं.

विनायकाला पाहून हरिण बालकें उड्या मारूं लागलीं. सूर्य हसत हसत वर येत होता. मंद मंद वाऱ्यांच्या लहरी विनूबाळाचा पाळणा हलवून झोका देत होत्या. शुकसारिका, भारद्वाज, कोकिला हे पक्षी गाणीं म्हणूं लागले. आश्रमाभोंवतालचे ओढे ताल धरून

नाचूं लागले. धुक्याचें वस्त्र नेसलेली धरणी या भाग्यवान बाळाकडे कौतुकानें पाहूं लागली.

महर्षि पराशर यांनीं विनायकाचें जातक ( भविष्य ) वर्तविलें कीं, "विनायक जरी कुरूप असला तरी तो मनानें सुंदर आहे. आपल्या आर्यभूचा हा नायक होईल. पराक्रमी, पुढारी, बुद्धिवान् असा हा बाळ होईल. सर्व देवांत ह्याला पहिला मान मिळेल याचें नीट जतन करा" हें भविष्य ऐकून माता अदिति फारच आनंदित झाली.

हळू हळू विनायक वाढूं लागला. रांगू लागला. बोबडे बोलूं लागला. उभा राहूं लागला. चालूं लागला.

विनायक सहा वर्षांचा झाला. आतां त्याचें उपनयन करण्याचें कश्यपांनीं ठरविलें. उपनयन-संस्कारासाठीं अनेक ऋषि आले. कैलासाहून शंकर आले. स्वर्गातून इंद्र आले. बद्रिकाश्रमाहून व्यास आले आणि पाताळांतील ( रत्नपुरीहून ) काशीराजाही आला. अरुंधती, रेणुका वगैरे थोर महिलाही जमल्या.

विनायकाचें मौंजीबंधन केलें आणि त्यानें गुरुजीसमोर शपथ घेतली कीं, "मी अग्निसाक्ष वेदविद्येचा अभ्यास करीन; माता, पिता आणि गुरु यांना मान देईन; देव, देश आणि धर्म यांसाठीं प्राण अर्पीन."

कश्यपानें विनायकास गायत्रीं मंत्र दिला. रेणुकेनें परशू दिला. शंकरानें त्रिशूळ व डमरु दिलें. व्यासांनीं महाभारताचें पहिलें पर्व दिलें. माहेश्वरीनें एकवीस मोदक दिले. अश्विनी-कुमारांनीं

एकवीस दूर्वा अर्पण केल्या. सर्वांनीं बटूस शुभाशीर्वाद दिले आणि तो समारंभ संपला.

नंतरच्या सहा वर्षांतच विनायकानें चारही वेदांचा अभ्यास पूर्ण केला. त्याकाळीं विनायकाचा दिनक्रम असा होता.—

" अगदीं पहाटेस उठावें, प्रातर्विधि आटोपावे, मातापिता आणि गुरुजन यांना वंदन करावें. जाह्नवी नदीच्या तीरावर जाऊन स्नान करावें; सूर्याला अर्घ्य देऊन गायत्री मंत्राचा जप करावा. कपडे धुऊन आश्रमांत परत यावें. गुरुजींच्या पूजापोथीचें साहित्य नीट मांडावें. गंध उगाळून ठेवावें. यज्ञाची तयारी करून ठेवावी; आणि गुरुजीकडून संथा घेऊन वेदपठण करावें.

आश्रमांतील पशुपक्ष्यांची सेवा करावी; वृक्षलतांची जोपासना करावी. जमीनीची मशागत करावी. गाईचें दूध काढून प्यावें. रानांतून लांकडें आणावी व समिधा आणाव्या; आणि फावल्या वेळांत सूत कांतून वस्त्रें विणावीं.

अशा रीतीनें अन्न, वस्त्र, निवारा, या बाबतींत स्वावलंबी बनून आरोग्य, शील, बुद्धि या बाबतींत सतेज व्हावें. "

विनायकाची ही वागणूक पाहून सर्वांना तो अति प्रिय झाला. आश्रमांतील एकवीसशें बटु त्याच्या आज्ञा ऐकत; त्याला नायक मानीत.

एकदां विनायकाला एक कल्पना सुचली. तो आपल्या सोबत्यांना म्हणाला, " हें पाहा तुम्ही एकवीसच्या गटा गटांनीं उभे राहा. प्रत्येकानें हातांत त्रिशूळ घ्यावा. प्रत्येकानें सूर्योपासना करावी व गायत्री मंत्र जपावा. प्रत्येकानें शिक्षण, शील आणि

शक्ति या बाबत सतेज व्हावें. शिस्तबद्ध वागून आपल्या मातृ-भूमीची सेवा करावी. देव, धर्म आणि देश यांच्या संरक्षणासाठीं प्रसंगीं प्राण अर्पण करण्याची प्रतिज्ञा करावी.

विनायकाची ही कल्पना सर्वांना फार आवडली. त्याप्रमाणें ते सर्व बटु उभे राहिले. त्यांनीं तशी प्रतिज्ञा केली आणि ते तसें वागूं लागले.

एकवीस गणांचा मुख्य तो गणपति. एकवीस गणपतींचा मुख्य तो गणेश. एकवीस गणेशांचा अधिकारी तो गणनायक. एकवीस गणनायकांचा शास्ता तो गणनाथ. एकवीस गणनाथांचा नियंता तो गजानन. एकवीस गजाननांचा नेता तो महागणपति.

अशा गटागटांनीं तें शिस्तबंध गणसैन्य तयार झालें. देशांत सर्वत्र याच कल्पनेचा प्रसार झाला आणि विनायक आतां मोठा गणपति बनला.

वेदाभ्यास संपल्यावर एकदां त्या सर्व बटूंनीं सहज गंमत म्हणून निरोप समारंभ केला. त्या दिवशीं त्यांनीं एक नाटक करून दाखविलें 'ऐरावत' नांवाचें तें नाटक विनायकानेंच लिहिलेलें होतें.

"अक्राळ–विक्राळ असा वणवा पेटला आहे. त्याच्या ज्वाळांनीं मोठमोठीं झाडें पेटत आहेत. पशुपक्षी भयभीत होऊन पळताहेत आणि तो भयंकर वणवा अरण्याचें राज्य जिंकीत जिंकीत पुढेंच चालला आहे.—

त्या वेळीं एक हत्ती आपल्या सोंडेनें त्या ज्वाळांवर पाणी एक-सारखें फेंकून तो वणवा विझवीत आहे; पेटलेलें अरण्य पुन्हां शांत करीत करीत तो गजराज पुढें पुढें चालत आहे; वणवा माघार घेत

घेत नाहींसा होत आहे; आणि पुन्हां पशुपक्षी स्वस्थानीं येत आहेत; भाजलेल्या जमीनीवर पाणीच पाणी होऊन तींतून दूर्वांकुर उगवले आहेत; लता पल्लवांनीं पुन्हां तें अरण्य सुशोभित झालें आहे; व सर्वत्र आनंदाचें साम्राज्य पुन्हां स्थापन झालें आहे."....

असें त्या नाटकाचें कथानक होतें. वाघ, सिंह, हरीण वगैरे प्राण्यांचीं कामें इतर बटू मुखावर मुखवटे चढवून करीत होते मुख्य चतुर गजराजाचें काम विनायकानेंच केलें. हत्तीचा मुखवटा चढविलेला तो नायक विनायक सर्वांना फारच सुंदर दिसला. सर्वांना तें नाटक आवडलें आणि सर्वांनीं गजराजाची म्हणजेच विनायकाची फार फार प्रशंसा केली.

ती आठवण म्हणून महागणपतीनें आपल्या ध्वजावर गजाचें चिह्न ठेविलें. आश्रम सोडल्यानंतर सर्व बटू आपापल्या गांवीं गेले. तेथेंही त्यांनीं त्रिशूलधारी सूर्योपासक सैन्य वाढविण्याचा उपक्रम चालूच ठेवला. संबंध आर्यावर्तांतील एकवीस गणराज्यांत त्या सूर्योपासक संघटनेचा प्रसार झाला आणि त्या महागणपतीची कीर्ति सर्वत्र पसरली. रत्नपुरीच्या काशीराजास मोठाच आधार मिळाला आणि कश्यप–अदितींस धन्यता वाटली.

वेदांचें शिक्षण संपल्यानंतर विनायक अमरावतीजवळ अश्विनी–कुमारांच्या आयुर्वेद–विद्यालयांत गेला. तेथें त्यानें सहा वर्षें आयुर्वेदाचा अभ्यास केला. त्याही आश्रमांतील विद्यार्थीगणांना त्यानें सूर्योपासक बनविलें.

दूर्वा, शमी, आघाडा, मंदार, तुळस, बेल इत्यादि साध्या वनस्पतींचें रहस्य आतां विनायकास चांगलेंच कळून आलें. या

वनस्पतींच्या योगानें असाध्य रोगही बरा होतो; हें विनायकास माहीत झालें. प्रकृति सुदृढ राखण्यासाठीं तो दररोज एकवीस दूर्वांचा रस घेऊं लागला.

आयुर्वेदाचें शिक्षण आटोपून त्यानें अश्विनीकुमारांचा निरोप घेतला.

आतां विनायक अठरा वर्षांचा झाला होता. आश्रमांतून बाहेर पडल्यावर त्यानें आर्यावर्तांत प्रत्यक्ष हिंडून गणराज्यांतील परिस्थिति पाहाण्याचें ठरविलें. तेव्हां त्याला नरांतक नांवाच्या राक्षसाचे अत्याचार ऐकून भयंकर राग आला. पण अद्याप वेळ आली नव्हती.

उत्तर—ध्रुवापासून विषुववृत्तापर्यंत आर्यावर्त होतें. आर्य लोकांनीं भरतखंडांत प्रवेश करून ठिकठिकाणीं अनेक लहान मोठीं राज्यें स्थापन केलीं होतीं. त्यांपैकी एकवीस गणराज्यें त्या काळीं फार प्रसिद्ध होती. रत्नपूरचा काशीराजा हा त्यांमध्यें विशेष माननीय होता.

प्रत्येक राजाचा ध्वज निराळा होता. व्याघ्र, सिंह, वराह, मूषक, मृग, वृषभ, गज इत्यादि प्राणी त्यांच्या ध्वजावर चितारले होते. त्या ध्वजावरूनही त्या त्या गणराज्यास गजध्वज, मूषकध्वज अशा नावांनीं संबोधिलें जाई.

भूत, पिशाच्च, नाग, गंधर्व, देव, मानव, मय, यक्ष नावांच्या जाती त्या काळीं होत्या. त्या सर्वांचीं कामें निराळीं पण भाषा एकच. सर्वजण आर्यकुलाचे घटक असून संस्कृत भाषेंतच त्यांचे सर्व व्यवहार चालत.

आर्यावर्तांचे बाहेर असुर आणि राक्षस नांवांच्या जाती राहत असत. ते लोक भरतखंडावर नेहमीं हल्ले करीत. राज्यें जिंकीत खूप त्रास देत आणि पराभव पावून पळून जात.

असुरांचें राज्य एका राणीच्या ताब्यांत होतें. तिचें नांव " जृंभा. " जृंभेला एक मुलगा होता. त्याचें नांव " नरांतक. "

नरांतक दिसण्यांत काळाकुळकुळीत होता. त्याचे डोळे भयंकर क्रूर होते. आसुरी सत्तेचा तो अगदीं अर्कच दिसत होता.

जृंभामातेची इच्छा होती कीं, " आपल्या नरांतकानें हिमालयाच्या पलीकडील भारतावर आक्रमण करावें. तेथील अपार संपत्ति पार लुटून आणावी. तेथील एकवीस राज्यें जिंकून आपलें राज्य वाढवावें. आर्य लोकांना आसुरी सत्तेपुढें नमवून त्यांच्या सूर्योपासक धर्माचा निःपात करावा. " जृंभेनें आपल्या महत्त्वाकांक्षेप्रमाणेंच नरांतकाला शिक्षण देऊन तयार केलें होतें.

नरांतकानें आर्यावर्तावर स्वारी केली. सिंधुरपूर येथें आपली राजधानी स्थापिली. आर्यांच्या गणराज्यांत एकी नव्हतीच. त्यांच्या फुटीचा फायदा घेऊन नरांतकानें एकेक राज्याचा घांस चावून चावून पचविला. एका गणराज्यावर नरांतकाचा हल्ला झाला तर दुसऱ्या गणराज्यांतील लोक शांत झोपा काढीत असत.

क्रमाक्रमानें पण लौकरच नरांतकानें सबंध भारतवर्ष जिंकून घेतला. फक्त तेवढें पाताळ म्हणजे काशीराजाचें गणराज्य जिंकायचें राहिलें. तेवढाच फक्त महापराक्रमी प्रबळ राजा राहिला. त्याचा समाचार मागाहून घेण्याचें त्यानें ठरविलें.

नरांतकाचें निशाण काळ्या रंगाचें होतें. त्यावर बत्तीस पांढरे

दांत काढलेले होते. नरान्तकानें आपला दंतध्वज फडकावून गर्जना करावी कीं, " जो कोणी माझ्या विरुद्ध जाईल, त्याला या बत्तीस दांतांखालीं मी चावून खाईन. " या त्याच्या गर्जनेनेंच कांहीं भित्रे ऐदी राजे त्याला शरण आले. कांहींनीं तर या असुर सम्राटाची मर्जी संपादण्यासाठीं आपल्या मुलीही दिल्या. कांहीं राजे लढले आणि पराभव पावून ते रडले, " आर्य लोकांत एकी नाहीं. कोणी कोणास मदत करीत नाहीं. "

याप्रमाणें सगळीकडे एकछत्री अंमल स्थिर—स्थावर झाल्यावर नरांतकानें आपल्या मांडलीक राजांना पुढील प्रमाणें हुकुम सोडले आणि त्या हुकुमाची कडक अंमलबजावणी सुरूं केली.

१ सूर्य—मंदिरांतील सूर्याच्या मूर्ति काढून टाका.

२ असुरमाता " जृंभादेवी " हिची पूजा करा.

३ प्रत्येक घरांतील एक स्वरूपवान तरुण स्त्री असुराच्या मुलाला देऊन टाका.

४ सुवर्णाचे अलंकार अंगावर घालूं नका.

५ जवळचें सर्व सोनें सिंधुरपूरच्या राजधानींत सम्राट् नरान्तकाच्या खजिन्यांत आणून टाका.

वरील नियमांच्या कडक अंमलबजावणीमुळें आर्यावर्ताला प्रेतकळा आली. सर्व सूर्यमंदिरें भ्रष्ट झालीं. सर्व सुवर्ण नष्ट झालें. स्वरूपसंपन्न तरुण मुली पटापट आत्महत्या करून घेऊं लागल्या. राक्षसांचें सैन्य गांवोगांव फिरून कनक आणि कामिनींचे शोध घेऊं लागलें. भयंकर धुमाकूळ झाला. दन्तध्वजाचें राक्षसी सैन्य आपल्या प्रचंड दांतांखालीं प्रजेला भरडून काढूं लागलें. जीवित

आणि वित्त यांचा नाश सुरू झाला नीतीचें स्थान भीतीनें घेतलें आणि....

नरान्तकाचा नाश करणारा कोणी तरी नरनारायण अवतरावा अशी सर्वत्रच इच्छा उत्पन्न झाली. सर्वजण सूर्यदेवाला तशी आर्त प्रार्थना करूं लागले.

"हे भगवान् सूर्यनारायणा, तूं आपल्या सहस्त्र किरणांनीं जगावर प्रकाश पाडतोस. पण आर्यांच्या मनांत सध्यां अंधाराचेंच वास्तव्य आहे; तेवढें सत्वर दूर कर. देवा, तुझ्या प्रकाशाचा फार दुरुपयोग होत आहे. त्यामुळें आर्यांच्या घरांतील सुवर्णसांठा दुष्ट नरान्तकाला दिसतो. त्याच प्रकाशामुळें आर्यांच्या तरुण सुंदर कुमारिका असुरांच्या नजरेंत भरून भ्रष्ट केल्या जात आहेत. भास्करा, तुझी मंदिरें असुरांनीं नष्ट केलीं. सर्वत्र अत्याचार माजविले; हें तुला दिसत नाहीं काय? या त्रासांतून वांचविण्यास एकही पराक्रमी पुत्र आर्यभारतांत जन्म घेत नाहीं काय? हे खगा, तसा एक तरी वीर जन्माला येऊं दे. भारत धन्य होऊं दे."....

अशा प्रकारची ज्वलंत उपासना व आर्त प्रार्थना सूर्यमंडलास जाऊन भिडली आणि महामुनी कश्यपांच्या धर्मपरायण पतिव्रता अदितीच्या पोटीं "विनायक" जन्माला आला. अठरा वर्षेंपर्यंत त्याचा प्रभाव कोणाही आर्यास दिसून आला नव्हता. पण....

नरांतकाचे अत्याचार महागणपती—विनायकास समजले. तेव्हां त्यास खूपच राग आला. पण अद्यापही वेळ आली नव्हती. विनायकास अस्त्रविद्या अवगत करायची होती. अजून सहा वर्षें अवकाश होता.

" तपश्चर्या पूर्ण झाली नाहीं आणि अकालीं प्रगट होऊन कार्य केलें तर अरुणाप्रमाणें पांगळेपणा येतो. एकवीस कोटी गायत्री-मंत्राचा जप करून आणि अस्त्रविद्या पूर्ण हस्तगत करून नंतर आपल्या सामर्थ्याचें तेज नरांतकास दाखवूं. तोंवर होऊं देत त्याच्या अत्याचारांचा कळस! जनतेला खूप खूप चीड येऊं दे त्याची! म्हणजे तरी जनता संघटित होईल. सर्वजण मग एकमेकां साह्य करतील आणि त्याच्या पराभवाचें कार्य सुलभ तरी होईल."

अशी विनायकाची विचारसरणी होती. तो आपल्या गणांना हाच उपदेश करी. मात्र त्रिशूलधारी सूर्योपासक गणांचें सैन्य सारखें वाढतच चाललें होतें. श्रीमहागणपतीचें तिकडे कटाक्षानें लक्ष होतेंच. असुरी सैन्यही त्या संघटनेकडे संशयानें पाहूं लागलें.

भूतानमध्यें गौरीशंकराचें "पाशुपत" नांवाचें अस्त्रविद्यालय होतें. त्या विद्यालयावर वृषभध्वज फडकत होता.

महागणपती विनायकानें एकवीसशें बटूंसमवेत त्या विद्यालयांत प्रवेश मिळविला. अस्त्रविद्यांचें अध्ययन आणि यज्ञयाग यांतच तेथें त्याचा सर्व वेळ जात असे. दाट धूर आणि धुकें यांच्या संमिश्रणानें तेथील वातावरण वेगळेंच बनलें जात असे. आश्रमांतील तरुलतासुद्धां वल्कलेंच परिधान करून जणूं तपाचरण करीत आहेत असें भासत होतें. साऱ्या तपोवनांत एकी, पवित्रता, प्रेम आणि तेज संचारलेलें होतें.

गणपती तेथें हठयोग शिकला. सर्व अस्त्रविद्या त्यानें झटकन् अवगत केली. त्याची धारणाशक्ति आणि गुरुभक्ति पाहून श्रीशंकर

अत्यंत संतुष्ट झाले. असा शिष्य मिळाल्यामुळें शंकराचें हृदय आनंदानें उचंबळून येई. ते विनायकाला आपला पुत्रच मानूं लागले.

धनुर्विद्या आणि एकवीस कोटी गायत्री मंत्राचा जप तेथेंच गणपतीनें पूर्ण केला.

शिक्षण आणि तपश्चर्या पूर्ण झाल्यावर विनायक आपल्या सहकाऱ्यांसह शंकरांचा निरोप घेऊं लागला. तेव्हां शंकरांना तर गहिंवर आलाच पण पार्वतीमातेला फार वाईट वाटलें. उमादेवी म्हणाल्या, “ गणपती, मी तुला पुत्र मानलें आहे. तुझा वियोग तर मला सहनच होत नाहीं रे, पण काय करूं ? जा, आपल्या पराक्रमानें त्या नीच नरांतकाचा नाश कर. माझा तुला आशीर्वाद आहे. ” गणपतीनेंही मोठ्या कष्टानें तेथून पाऊल उचललें. पार्वतीमातेच्या वात्सल्यप्रेमाची त्याला फार फार आठवण राहिली. भूतानच्या राज्यांतील लोक गणपतीला पार्वतीशंकरांचा मुलगाच म्हणत असत. तीच प्रथा आर्यावर्तांत सर्वत्र चालूं झाली.

चोवीस वर्षांचा तरुण विनायक आतां श्रीशंकराच्या आशीर्वादानें विलक्षण तेजस्वी झाला. त्याच्या समवेत एकवीसशें गणपति संचार करूं लागले, ठिकठिकाणीं भारतांत तें गणसैन्य फिरूं लागलें.

सभा जिंकण्यासाठीं प्रत्येक राज्यांतील गुरुकुलांत जाऊन पंडितांशीं गणपतीनें वादविवाद करावा आणि विजयपत्र घ्यावें. तोंवर त्याच्या एकवीसशें मित्रांनीं राज्यांत गांवोगांव सूर्योपासनेचा प्रसार करून अत्यंत शिस्तबद्ध गणसैन्य तयार करून ठेवावें, असा क्रम सुरू झाला.

3270

या प्रवासांत महागणपतीनें आर्यावर्ताचें निरीक्षण केलें. नरांतकाच्या अत्याचाराला बळी पडलेल्या आर्त अनाथांच्या किंकाळ्या ऐकल्या. त्यांचे अश्रु पुसले आणि त्यांना धीर दिला. दुष्ट नरान्तकाच्या नाशाची आतां त्यानें प्रतिज्ञाच केली. त्याप्रमाणें आपल्या सर्व गणसैन्यास हुकूम सोडले.

राक्षसांच्या विरुद्ध गणसैन्याचें आतां संचलन सुरू झालें आणि ठिकठिकाणीं त्या असुरी सैन्यास प्रत्यक्ष प्रतिकार होऊं लागला. लौकरच ही बातमी नरांतकास समजली.

नरान्तकाची धुंदी आतां पार उतरली. दशदिशांनीं वार्ता येऊन थडकूं लागल्या तेव्हां नरांतकानें आपला हेरांचा प्रमुख धूम्राक्ष यास विचारलें, "धूम्राक्षा, या गणसैन्याची काय भानगड आहे? हे लोक आहेत तरी कोण? ते कसें वागतात?"

धूम्राक्ष म्हणाला, "महाराज हे लोक कश्यपपुत्र विनायकानें तयार केले आहेत. एकवीस एकवीसांच्या गटा—गटांनीं वाढत थेट महागणपतीपर्यंत यांची मालिका आहे. हातीं त्रिशूळ घेऊन गजध्वजाखालीं जमतात, सूर्योपासना व गायत्रीमंत्र हा यांचा धर्म आहे. देव, देश आणि धर्म यांच्या संरक्षणासाठीं प्रसंगीं प्राण अर्पिण्याची त्यांनीं शपथच घेतली आहे. आपल्या सबंध साम्राज्यांत यांचें खूळ वाढत चाललें आहे. आपल्या हुकुमाचा व सैन्याचा ठिकठिकाणीं हे लोक प्रतिकार करूं लागले आहेत. आपलें जर आसुरी सैन्य वाढविलें नाहीं आणि यांचा जर बंदोबस्त केला नाहीं तर लौकरच आपलें साम्राज्य बुडणार आहे.

मला वाटतें त्या पाताळांतील रत्नपुरीचा काशीराजाही या उद्दाम गणपतीला सामील असावा. ”

नरांतकाच्या रागाचा पारा आतां तर खूप चढला. तो दांत-ओठ खात म्हणाला, “ सांग ! धूम्राक्षा, त्या महागणपतीच्या या कारस्थानाची सारी माहिती मला सांग; म्हणजे तरी मला कांहीं मार्गानें त्याचा सत्वर बंदोबस्त करतां येईल. आजपर्यंत तुम्ही माझे सर्व अधिकारी नुसत्या संशयानेंच या लोकांकडे पाहात बसला. यापूर्वींच मला जर माहिती दिली असती तर....”

धूम्राक्ष नम्रतेनें म्हणाला, “ महाराज, तर यापूर्वींच ही चळ-वळ आपण नेस्तनाबूद केली असती. पण....पण हे लोक लहान बालकें विद्यालयांतील विद्यार्थी होते. तेथें आश्रमांत गायत्री मंत्राचा जप करीत. सर्व प्रकारचें शिक्षण घेत त्यांना आम्ही कसें वरें अडथळा आणणार ? आपण आश्रम जर उध्वस्त केले असते अथवा दैत्य नोकर जर विद्यालयांतून ‘ गुरुजी ’ म्हणून नेमले असते तर मुळांतच हे खूळ माजलें नसतें; पण....आपण तेवढेंच काम फक्त केलें नाहीं. आणि त्या क्षुल्लक गोष्टींचा परिणाम हा आज असा भोगावा लागत आहे. मीं तर अलीकडे असेंही ऐकतों कीं,

“ अलीकडे आर्य स्त्रियाही सूर्योपासनेचें व्रत घेऊन अंकुश-धारी बनत आहेत आणि त्याही आतां प्रत्यक्ष प्रतिकाराची चळ-वळ उभारीतच आहेत. आपण ज्या एकवीस हजार तरुण कुमा-रिका आपल्या सिंधुरपुरांतील कारागृहांत कोंडून ठेवल्या आहेत त्यांच्या सुटकेसाठीं प्रत्यक्ष आपल्याच राजधानींतील दोन मुली ऋद्धि आणि सिद्धि यांनीं आंतून प्रयत्न चालविले आहेत.

ऋद्धि आणि सिद्धि राजधानींतून दूर जंगलांत भूमीगत झाल्या आहेत. तेथें त्यांना आठ मैत्रिणी लाभल्या आहेत. त्यांच्या मद-तीनें व महागणपतीच्या मार्गदर्शनानें त्या खूप मोठें स्त्री–सैन्य तयार करणार आहेत. मग तर आपला निभाव लागणें अश-क्यच आहे."

धूम्राक्षानें दिलेली माहिती ऐकून त्या क्रूर नरांतकानें भिंवया चढवून हुकूम सोडले, "चोहोंकडून असुर आणि राक्षसांचें लक्षा-वधि सैन्य बोलवा. आर्यांच्या एकवीस गणराज्यांच्या सीमांवर तें सैन्य ठेवा. त्या सैन्याच्या पोषणास गाईचे मांस घेत चला. सूर्य-मंदिरें चूर्ण करा. स्त्रियांवर अत्याचार सुरूं करा. सर्व तऱ्हेच्या चळवळी मोडून टाका. गणसैन्यांचा नाश करा."

झालें. लगेच तशी अंमलबजावणी सुरू झाली. इकडे एकदां फिरतां फिरतां महागणपति कांबोज या नगरांत आला. तेथील त्रिशूळधारी सूर्योपासक गणसैन्यानें त्रिशूळांच्या कमानी उभारून त्याचें स्वागत केलें. त्या सैनिकांचें तेज आणि शिस्त पाहून विनायकास धन्यता वाटली.

कांबोजिया नदींत कमरेइतक्या पाण्यांत महागणपति स्नान करून गायत्रीमंत्राचा जप करीत ध्यानस्थ उभा होता. इतक्यांत एका नम्रपण मंजुळ आवाजानें त्याच्या ध्यानधारणेचा भंग झाला. त्यानें डोळे उघडून समोर पाहिलें तों अंकुशधारी दहा तेजस्वी कुमारिका हात जोडून उभ्या होत्या. त्या म्हणाल्या,

"महाराज, आम्हांला मार्गदर्शन करा. आम्ही सूर्योपासक स्त्रीगणसैन्य उभारीत आहों, सिंधुरपुरांत एकवीस हजार तरुण

कुमारिका त्या दुष्ट नरान्तकाच्या तावडींत खितपत पडल्या आहेत. त्यांची सुटका करण्यासाठीं; आर्यसुवासिनींची अब्रू वांचविण्यासाठीं आणि स्त्रीधनाचें रक्षण करण्यासाठीं आम्ही दहा कुलवंत कुमारिकांनीं शपथा घेऊन हें कार्य उभारलें आहे. आपण आशीर्वाद देऊन कांहीं मार्गदर्शन करावें अशी विनंती आहे."

त्या कुमारिकांना नमस्कार करून तो विद्यादाता महागणपति म्हणाला; "भगिनींनो, तुम्ही अंकुश बाळगितां हें ठीक आहे. कारण स्वसंरक्षणास तें अवश्यच आहे. अंगांत सामर्थ्य येण्यास रोज सूर्याला एकवीस प्रमाणें नमस्कार घालीत चला. एकवीस एकवीसच्या गटागटांनीं स्त्री सैन्याची योजना करा. अशा सूर्योपासक स्त्री सैनिकांचे आठ विभाग करा. आणि कार्यें वांटून घेऊन पार पाडा. तुमच्या शक्ति, भक्ति आणि तेजाचें हें कार्य सर्व भरतखंडाच्या विमोचनास निश्चित साह्य देईल."

## कामांची वांटणी

१ प्रथिमा—शहर व्यवस्था
२ प्रकाम्या—हेरखातें
३ वशिता—रुग्णशुश्रूषा
४ महिमा—नौकायन
५ ईषिता—न्यायखातें
३ गरिमा—आश्रमव्यवस्था
७ लघिमा—कृषि–संवर्धन
८ प्राप्ति—बाल–रक्षण
९ ऋद्धि—स्त्री सैन्य तयार करणें व संचलन.
१० सिद्धि—या सर्व विभागांवर देखरेख.

याप्रमाणें त्यांना मार्गदर्शन करून व सर्व व्यवस्था लावून विनायक फिरत फिरत परत कश्यपांच्या आश्रमांत म्हणजे स्वगृहीं आला. मातापित्यांना फार आनंद झाला.

कश्यपांच्या आश्रमांत एके दिवशीं कांहीं ऋषिकुमार आले, त्यांनीं व्यासांचा निरोप सांगितला, "महामुनी व्यासांनीं विनायकाला भेटीसाठीं ताबडतोब बोलाविलें आहे. तरी हजार कामें बाजूस ठेवून अगोदर बद्रिकाश्रमीं महागणपतींनीं चलावें."

त्याचवेळीं रत्नापुराहून काशीराजांचा दूत तेथें आला. तो म्हणाला, "पातालाधीश काशीराजे यांच्या मुलाचें लग्न ठरविण्यास आणि त्या लग्नाचें पुरोहित म्हणून काम करण्यास श्रीमहागणपतींना निमंत्रण आहे. तरी हजार कामें बाजूस ठेवून ताबडतोब रत्नपुरीस चलावें."....

वरील प्रमाणें दोन्हीं तांतडीचे निरोप ऐकून विनायकास पंचाईत पडली कीं अगोदर कोणाकडे जावें ? तथापि त्यानें विचार करून ठरविलें कीं "आपण प्रथम व्यासमुनींची भेट घ्यावी नंतर पाताळांत उतरून काशीराजांच्या पुत्राचा लग्नविधि पार पाडावा." तसा निरोप दूताकरवीं त्यानें काशीराजांस पाठविला. आणि त्या ऋषिकुमारांसमवेत तो आपल्या गणांसह बद्रिकाश्रमास व्यासांचे भेटीस निघाला.

वाटेंत घनदाट अरण्य होतें. गगनभेदी उंच उंच ताल तमाल वृक्षांनीं तेथील भूमि आच्छादून टाकली होती. सर्वत्र अंधाराचें

साम्राज्य पसरलें होतें. सूर्यकिरणांना तेथें मुळींच शिरकाव मिळत नव्हता. वन्य, श्वापदांच्या गंभीर गर्जना. पक्ष्यांचा चीत्कार आणि पानापाचोळ्यांची सळसळ यामुळें तेथें विलक्षण आणि भयंकर भीतिचेंच वातावरण झालें होतें.

तशांतच त्या ठिकाणीं दुष्ट नरांतकाचें राक्षसी सैन्य दडून बसलें होतें. महागणपति त्या मार्गानें जाणार आहे, याचा सुगावा त्या पाताळयंत्री धूम्राक्षानें अगोदरच काढून ठेवला होता. विनायकाला त्याच अरण्यांत ठार करण्याची त्यानें योजना केली होती.

क्षणांत एक मस्त हत्ती विनायकावरच चाल करून आला. विनायकानें चटकन त्याच्यावर पाश फेकून त्याची सोंड आणि पुढील दोन पाय आवळून टाकले. नंतर त्याच्या गंडस्थलावर उडी घेऊन त्यास त्रिशूळ खुपसून ठार केलें.

मदोन्मत्त हत्ती असा निमिषांत कोसळलेला पाहून राक्षस–सैन्य पळून गेलें. नारदमुनींनीं गणपतीवर फुलांचा पाऊस पाडला.

विनायक बद्रिकाश्रमांत आला. त्यानें व्यासांना वंदन केलें. आणि नम्रपणें विचारलें " गुरुजी, आपली काय आज्ञा आहे ?"

महागणपतीच्या भेटीनें व्यासांना फारच आनंद झाला. ते सद्गदित कंठानें म्हणाले, " विनायका तूं कवींचा कवि व बुद्धिदाता आहेस. मी महाभारत रचीत आहे. पहिलें पर्व तुला मौजीबंधनाचे वेळीं मी अर्पण केलेंच होतें. नंतर अठरा पर्वांचा आराखडा मीं पूर्ण केला आहे. पण आतां मी वृद्ध झालों. मला महाभारत पूर्ण लिहिण्यास साह्य कर. वत्सा, तूं धन्य आहेस."

गुरुजींची आज्ञा शिरसावंद्य करून गणपतीनें महाभारत पूर्ण करण्यास व्यासांना मदत केली. त्याच्या प्रदीर्घ प्रतिभेचा विलास पाहून प्रत्यक्ष सरस्वती त्याच्यावर लुब्ध झाली. ती गणपतीची दासी झाली.

महाभारताचें काम संपलें. गणपतीनें व्यासांचा निरोप घेतला. व्यासांनीं त्याला आशीर्वाद दिला, "हे सूर्योपासका, या थोर भारतांत तुझ्या आज्ञा वेदमंत्राप्रमाणें मानल्या जातील, जा सर्वत्र तूं विजयीच होशील.

महागणपतीनें बद्रिकाश्रमाहून निघतांना महाभारताच्या एकवीसशें प्रति आपल्या गणांकडून करून घेतल्या होत्या, त्या बरोबर घेतल्या. आणि सबंध आर्यावर्तांत त्या प्रति विभागून पाठविल्या.

घरोघर भारताचें वाचन, पठन व मनन सुरूं झालें. महागणपतीचें नांव आबालवृद्धांच्या जिव्हेवर खेळूं लागलें. प्रत्येकास वाटे कीं, "गणेशाप्रमाणेंच आपला मुलगा थोर प्रतिभावान् बनावा" म्हणून मुलांना पहिला पाठ शिकवितांना "श्रीगणेशाय नमः" अशीं अक्षरें शिकविण्यांत येऊं लागलीं.

प्रत्येक ठिकाणीं आतां गणेशाचें पूजन सुरूं झालें. ठिकठिकाणीं त्याचें प्रचंड स्वागत झालें. सर्व जातींच्या लोकांनीं त्याच्यावर पुष्पवृष्टि करून जयजयकार केला.

महागणपति आपल्या एकवीसशें गणांसह सिंधुरपुरास वळसा घालून महापर्वत ज्वालामुखी ओलांडून थेट पाताळांत रत्नपूरच्या काशीराजाच्या मुलाच्या लग्नसमारंभास निघाला. पण रस्त्यांतच आणखी एक विघ्न आलें.

वाटेंत आणखी एक भयंकर अरण्य होतें. त्या अरण्यांत नरांतक शिकारीसाठीं येत असे. तेथें नरांतकाचें वनरक्षक सैन्य उभें होतें. त्या सैन्यानें गणपति व त्याचे गणांवर खूप जोराचा हल्ला चढविला.

गणपति पुढें होऊन सैन्य-प्रमुखास म्हणाला, "हे दानवा, आम्ही सर्व भिक्षुक आहों. कां उगीच आम्हाला छळतां ? सोडा वाट !"

त्यावर नरांतकाचा सेनापति म्हणाला, "अरे कश्यपाच्या पोरा, तुझी भिक्षुकी तर आम्हाला चांगलीच समजली आहे. तूं थोर नरान्तक महाराजांचें साम्राज्य उलथून टाकण्याचा प्रयत्न चालविला आहेस ! थांबा ! कार्ट्यांनो, तुमच्या कोंवळ्या मांसाची मेजवानीच घालतों आज आमच्या शिकारी श्वापदांना."

लगेच ते क्रूर सैनिक गणपतीवर व त्याच्या मित्रांवर तुटून पडले. विनायकानें मग त्यांच्यावर मोहनास्त्र सोडलें आणि त्यामुळें ते सर्व सैनिक बेशुद्ध होऊन घोर निद्रेंत पूर्ण निपचित पडले.

गणराज नंतर सिंदूर–चर्चित गजध्वज फडकावीत आपल्या एकवीसशें गणांसह काशीराजाच्या रत्नपूर राजधानींत पोंचला.

राजानें त्यांचें थाटाचें स्वागत केलें. सूर्यमंदिरांत त्यांना उतरण्यास जागा दिली. रस्त्यारस्त्यांतून एकवीस हजार सुवासिनी दुतर्फा उभ्या होत्या. त्यांनीं गणपतीला सिन्दूर–तिलक लावला आणि पंचारतींनीं ओवाळिलें. स्वागत–समारंभ संपला आणि सूर्यमंदिरांत प्रार्थनाही झाली.

कुमारी प्रकाम्या ( हेरखात्याची मुख्य ) महागणपतीला संदेश सांगू लागली, "महाराज, मोहनिद्रेंतून जागा झाल्यावर वनरक्षक

सैन्य-प्रमुख ‘ज्वालामुखी’ नरांतकाकडे गेला. त्यानें झालेली हकीगत त्याला निवेदिली. तेव्हां नरांतकानें हुकूम सोडला कीं, “तावडतोब एकवीस गणराज्यें ताब्यांत घ्या. काशीराजाच्या रत्नपुरावर हल्ला करा. रणकंदन सुरू करा.” हे गणराजा, त्या पाहा रणघंटा वगवणूंच लागल्या आहेत. तयारींतच राहावें आपण. लगेच महागणपतीनेंही आपल्या सर्व सैन्यास युद्धाचा आदेश दिला. रणदुंदुभी वाजूं लागल्या.

वृद्ध काशीराजा तर युद्धाच्या भीतीनें थरथर कापूं लागला. लयांत हें विघ्न आलें! तो तसा शूर होता; पण यावेळीं त्याला युद्धच नको होतें. पण! पण काय करणार?

काशीराजाचा एक राजनिष्ठ प्रधान त्याला म्हणाला, “महाराज, या कश्यपपुत्र विनायकाला पकडा आणि त्याला नरान्तकाचे स्वाधीन करा. त्याच्यामुळेंच केवळ आपल्यावर हा अनर्थ कोसळला आहे. इतके दिवस नरांतकाची चिशाद नव्हती; त्यानें आपणांकडे डोळा उचलून कधीं पाहिलेंही नव्हतें; पण केवळ या पोरामुळें त्या दुष्टाची नजर आपणांकडेही वळली आहे. या भिक्षुकांच्या पोरांनीं दर्भ हातीं घेण्याचे सोडून दळभार निर्माण केला आहे. यांची चांगलीच खोड मोडली पाहिजे. अहो, प्रत्यक्ष माझी ही मुलगी ‘महिमा’ या सूर्योपासक सैन्यगणांच्या नादीं लागली; आणि तिनें समुद्रयुद्धासाठीं स्त्री-सैन्य तयार केलें. मीं तिला खूप खडसावलें; पण ती म्हणते “समुद्रपर्यन्तायाः एकराट्” आहे. तें कांहीं नाहीं! आपलें राज्य आपण वांचविलेंच पाहिजे. चला. त्या गणेशाला पकडूं या अगोदर.”

गणेशाला ही बातमी समजली. तेव्हां त्याला त्या प्रधानाच्या स्वार्थी कारस्थानाची कींव वाटली. तो आपण होऊन काशीराजाकडे गेला; आणि म्हणाला, " पितामह, तुमची इच्छा असेल तर खुशाल मला नरान्तकाचे स्वाधीन करा. पण त्यामुळें तरी तुमचें राज्य टिकणार आहे काय ? आर्यस्त्रियांची अब्रू त्यामुळें तरी वांचणार आहे काय ? सिंधुरपुरांतील एकवीस हजार कुलस्त्रिया या नीच राक्षसांच्या तावडींतून त्यामुळें सुटतील काय ? आपल्या सूर्योपासक सद्धर्माची प्रगति होणार आहे काय ? तसें होणार असेल तर मी आणि माझें गणसैन्य खुषीनें प्राण अर्पण करूं. तुमचे आभार मानूं! परन्तु पाहा. या दुष्ट नरभक्षक नरांतकानें किती अत्याचार केलेले आहेत ! ! मागचे अनुभव पाहा. आपण थोर विचारी आहां. आर्यावर्तांत शूर कीर्तिवान्, बलवान् व माननीय आहां. आर्य लोकांचा धर्म, देश आणि स्त्रीधन यांचें रक्षण करण्यासाठीं आतां नरान्तकाचा नाशच केला पाहिजे. तुम्ही नुसता आशीर्वाद देऊन खंबीरपणें आम्हास पाठिंबा द्या. आम्ही हें अत्याचारांचें मूळ आजच समाप्त करतों. स्वार्थी प्रधानाचें मानूं नका. "

गणेशाचें बोलणें काशीराजास पटलें. त्यानें युद्धास परवानगी दिली आणि धर्म-देश-द्रोही स्वार्थी प्रधानास कंठस्नान घातलें.

महागणपतीनें आपल्या सर्व गणसैन्यास हुकूम सोडले. कामें वांटून दिलीं. सर्व आर्य तरुण त्रिशूळ घेऊन घराबाहेर पडले. देहाची व प्राणांची पर्वा न करतां गजध्वजाला प्रणाम करून डमरूच्या निनादांत त्यांनीं युद्धाची गर्जना केली. सर्वत्र भारतांत तो पडसाद घुमून उठला. ऋद्धि सिद्धि आणि अष्टनायिकांचें

स्त्रीसैन्य आपापलें कामास सज्ज झालें. सर्व व्यवहार शिस्तींत आणि सुयंत्र चालले.

वीस दिवस घनघोर युद्ध चाललें होतें. लक्ष लक्ष सूर्योपासक गण प्राण पणाला लावून लढत होते. महागणपती सबंध आर्यावर्तावर लक्ष ठेवून विजेच्या वेगानें गणसैन्याचें संचलन करीत होता.

वीस राज्यें एकदम लढत ठेवून तो क्रूर नरांतक स्वतः आपल्या निवडकशा आसुरी सैन्यासह रत्नपुरावर चाल करून आला. गांवाबाहेर त्यानें रात्रीं तळ ठोकला.

गणेशाच्या सूर्योपासनेची आज परीक्षाच होती. अदितीच्या तपश्चर्येची आज समाप्ती होती. मृत्युंजयाच्या धनुर्विद्येचें तेज आज गणेशाच्या रूपानें प्रगट झालें होतें.

पहाटेच्या वेळींच प्रचंड गजावर बसून तो नरान्तक दैत्य दुंदुभी वाजवीत भयंकर क्रूर राक्षसांसह गणपतीवर चालून आला.

गणेशाच्या पाठीशीं थोरांचे आशीर्वाद हिमालयाप्रमाणें उभे होते. तो मुळींच डगमगला नाहीं. धीरानें पुढें चाल करून गेला.

दंतध्वजाच्या लहरीवर नाचत, थैमान घालीत असुर सैन्य लढत चाललें होतें. खड्ग, पट्टे, शूल, गदा, मुसळ, नांगर, बाण, चक्र, परशु इत्यादि आयुधांच्या खणाखणींत रक्ताचे पूर वाहूं लागले. त्या क्रूर राक्षसांनीं गणेश-सैन्याची सरसहा कत्तल आरंभिली. मस्तकें तोडलीं, बरगड्या फोडल्या, नेत्र काढले. दशदिशा अंधकारमय झाल्या. पृथ्वी कंपित होऊं लागली. समुद्र उफाळला.

दन्तध्वजावर गृध्रपक्षी येऊन बसूं लागले; भालू अमंगल ओरडूं

लागले; उल्कापात झाले. त्या अपशकून व उत्पातांची पर्वा न करतां नरान्तक त्वेषानें लढतच होता.

क्रुद्ध झालेल्या महागणपतीनें भिवया चढविल्या आणि त्या अत्याचारी नराधमावर चाल केली. लगेच नरांतकानें एक महाभयंकर शूल विनायकावर फेंकला. पण तो शूल गणेशानें मोडून पाडला. या कामीं त्याला श्रीदुर्वासांनीं दिलेल्या शक्तीचा उपयोग झाला.

नंतर गजाननानें एक तेजस्वी बाण काढला. तो बाण त्याला शंकरांनीं दिला होता. तो बाण सुवर्णभूषित, धूम्रयुक्त आणि भुजंगाप्रमाणें तीक्ष्ण होता. गणेशानें तो बाण काढून सूर्य-नारायणास वंदन केलें. पूज्य शंकराचें स्मरण केलें आणि पाशुपत धनुष्यास जोडून थेट नरान्तकाच्या वक्षस्थळावर सोडला.

धाडकन् नरान्तकाचें धूड भूमीवर कोसळून पडलें. नरांतकाचा प्राण निघून गेला. आणि आर्यभूवरील अत्याचारांचा शेवटच झाला. राक्षस-सैन्य सैरावैरा पळत सुटलें.

हें युद्ध पाहण्यास अंतरिक्षांत देव, गंधर्व, यक्ष, किन्नर यांच्या विमानांची दाट झाली होती. विजयी गणपतीवर आकाशांतून तारकापुष्पांची वृष्टि झाली. "विनायकाचा विजय असो." नाद निनादला!

आर्यावर्तांत गणेशाच्या विजयाची वार्ता वायुवेगानें पसरली. सूर्योपासक गण सैन्याला धन्यता वाटली. ऋद्धिसिद्धि आणि अष्टनायिकांचे स्त्रीसैनिक विजयानें फुलून गेले. सिंधुरपुरांतील एकवीस

हजार कुमारिका बंधमुक्त झाल्या. विजयाच्या जयघोषांनीं अंतराळ कोंदून गेलें.

आर्य-भारतांत अखंड गणराज्याची पुन्हां स्थापना झाली. काशीराजाला त्या गणराज्यांचें मुख्य नायकत्व प्राप्त झालें. सर्व मांडलिक राजांनीं काशीराजाचा आणि श्रीमहागणपतीचा सन्मान केला.

अनेक वैभव-संपन्न मांडलिकांकडून गणेशाला भोजनाचीं निमंत्रणें आलीं; पण एका शुक्र नांवाच्या गरीब ऋषीनें गूळ खोबरें घालून तयार केलेले एकवीस मोदक आणले होते; तेच त्या महागणपतीला फार आवडले. ते मोदक खाऊन गणेशानें ढेकर दिला. गणेश म्हणाला; "मला हेच मोदक अतिशय आवडतात."

अशा रीतीनें सत्कार-समारंभांत आणि आनंदोत्सवांत तो काळ झटकन निघून गेला.

भारतीय गणराज्याचे पहिले अध्यक्ष श्री-काशीराजे यांनीं महागणपतीस त्या राज्याचें सेनापतिपद स्वीकारण्याची विनंती केली.

पण गणेश म्हणाला, "महाराज, आतां माझें अवतार-कार्य संपलें. मला सत्तेची तर मुळींच अभिलाषा नाहीं. मला आनंदानें निरोप द्यावा."

भाद्रपद शुद्ध चतुर्थीचा तो दिवस होता. श्रीमहागणपति आपल्या शिल्लक राहिलेल्या अनुयायांसह रत्नपुरीहून उत्तरेस निघाला. सर्व जनता शोकाकुल झाली. त्यांनीं त्या गणेशाचे स्मारक म्हणून हत्तीचा मुखवटा घातलेली भव्य मूर्ती तयार केली

आणि भक्तिभावानें त्या मूर्तीची मंदिरांत स्थापना केली. मोठ्या थाटानें दहा दिवस उत्सव सुरूं केला.

प्रत्येक राज्याला भेट देत देत, विनायक हिमालयाकडे निघाला. ठिकठिकाणीं जनतेनें त्याचा भव्य सत्कार केला. त्याची मूर्ति करून स्मरणार्थ मंदिरांत स्थापन केली. उत्सव केले. सिंधुरनगरांतील बंधमुक्त कुमारिकांनीं नयनांचीं नीरांजनें ओवाळून गणेशांचें स्वागत केलें. कृतज्ञतेनें त्या भारून गेल्या होत्या.

नंतर गणेश आपल्या पित्याच्या .... कश्यपांच्या आश्रमांत आला. त्यानें मातापित्यांस वंदन केलें. चरणीं मस्तक ठेविलें.

विश्ववंद्य झालेल्या आपल्या पुत्रानें तिन्हीं लोकांत कीर्तीचा झेंडा रोविलेला पाहून आणि अत्याचारांतून आपल्या आर्य भारत-मातेची सुटका केलेली ऐकून माता अदितीस धन्य धन्य वाटलें !

आदिती विनायकास म्हणाली, "बाळा, आतां तुझा ब्रह्म-चर्याश्रम संपला. यापुढें लग्न करून सुखानें आदर्श संसार कर. ब्रह्मदेवाची मुलगी कुमारी सरस्वति–शारदा ही तुझ्यासाठीं पत्नि म्हणून आम्ही ठरविली आहे. महाभारताची रचना तूं केलेली पाहून ती विदुषी कुमारी तुझ्यावर लुब्ध झालीच होती. तरी आतां तिच्याशीं लग्न कर !"

गणेश आईला म्हणाला, "माते, क्षमा कर. मी माझ्या राष्ट्राचा संसार उभा केला आहे. मला स्वतःचा व्यक्तिशः संसार करायची इच्छा नाहीं. भारताची सेवा करण्यांतच मी माझें आयुष्य घालवीन. मला लग्न नको !"

अनंतचतुर्दशीचा दिवस उजाडला. आर्यभारतांत दहा दिवस अत्यंत थाटानें भव्य समारंभ पार पडले. जनतेनें केलेला हा सत्कार पाहून विनायकास वाटलें,—

“ जनतेच्या मनांत हें आपलें कार्य कायमचें स्थान देऊन राहावें. ज्या वेळीं अधर्मीय दुष्टांकडून भारतावर अत्याचार होतील त्या त्या वेळीं जनतेंत गणपतींचें कार्य उत्पन्न व्हावें आणि माझ्या पद्धतीप्रमाणेंच सर्व भारतांत देव, देश आणि धर्म यांचें संरक्षण व्हावें. आर्यस्त्रीधनाचें मानानें रक्षण व्हावें म्हणून माझे हे सत्काराचे दहा दिवस दरसाल साजरे होऊन माझ्या कार्याचें स्मरण जनतेस व्हावें. याकरितां आजच........

या अस्तास चाललेल्या भगवान् सूर्यनारायणाच्या समवेतच मी माझ्या पार्थिव–देहाचें योगमार्गानेंच विसर्जन करणार !

विचार मनांत आला आणि प्रत्यक्ष कृतींत उतरला. तो महागणपति नदीतीरावर गेला. त्यानें गायत्री मंत्राचा जप केला आणि नदीच्या त्या अथांग पाण्यात जिवंत जलसमाधि घेतली.

झालें ! महागणपतीचा अवतार संपला. ही बातमी अखिल आर्यावर्तांत हां हां म्हणतां पसरली. जनतेच्या दुःखाला पारावार राहिला नाहीं. जो तो नदीतीराकडे तीरासारखा धांवत सुटला. अनेकांनीं नदींत बुड्या....मारल्या.

“ गणपति बाप्पा मोरया !
पुढल्या वर्षीं लवकर या. ”

अशा आरोळ्यांनीं अंतराळ दुमदुमून गेलें.

कश्यप, अदिति, काशीराजा, सर्व गण, ऋद्धि, सिद्धि आणि अष्टनायिका यांना तर अतिशय दुःख झालें. तथापि विनायकाच्या कार्याचा त्यांनीं अखिल विश्वांत प्रसार करण्याचें ठरविलें.

भारतानें गणेशचतुर्थीपासून अनंतचतुर्दशीपर्यंत श्रीगणेशोत्सव दरसाल पाळण्याचें ठरविलें.

---

# —गणेशमूर्ति ध्यान व आरति —

१ वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटीसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा ॥

२ सुखकर्ता. दुःखहर्ता, वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा देवाची ।
सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची ।
कांठीं शोभे माळ मुक्ताफळाची ॥ १ ॥
रत्नखचित फरा, तुज गौरी–कुमरा ।
चंदनाची उटी कुंकुम–केशरा ।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नुपुरे चरणीं घागरिया ॥ २ ॥
लंबोदर पीतांबर फणिवर वंदना ।
सरळ सोंड, वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट माहे सदना ।
संकष्टीं पावावें–निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ॥ ३ ॥
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति ।
दर्शन मात्रें मनकामना पुरती ॥
जयदेव जयदेव ।

३ गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा ।
नमूं शारदा मूळ चत्वारि वाचा ।
गमे पंथ हा नित्य त्या राघवाचा ॥

# —विशेष—

—गणेशाचें पोट मोठें आहे. कारण—

१ त्यांत ब्रह्मांड साठविलें आहे.

२ अनंत लोकांचे अपराध तो पोटांत घालतो.

३ विशाल उदराचा देव क्षमाशील आहे.

—गणेशाचे डोळे बारीक आहेत. कारण—

१ त्याला दूरवरचें चांगलें पाहतां येतें.

२ शक्य तितकें तो कमी पाहतो.

३ त्याची सूक्ष्म नजर सर्वत्र असते.

४ डोळे वटारून तो कधींही कुणावर रागवत नाहीं.

—गणेशाचे कान सुपासारखे आहेत. कारण—

१ त्याला दूरवरचें झटकन ऐकूं येतें.

२ तो हलक्या कानांचा नाहीं.

३ कान पसरून ऐकण्याची त्याला जरूर नाहीं.

—गणेशाला चार हात आहेत, कारण—

१ चार हातांनीं तो खूप कामें करतो.

२ लग्न होऊन त्याचे चार हात झाले नाहींत.

३ चोहोंकडे सर्व कामांत सर्वांना त्याचे हात मदत करतात.

...3200...

# श्री. त्र्यं. ग. बापट

## यांची पुस्तकें

१. निबंध संकलन. ( निबंध )
२. इसापच्या सहवासांत ( कथा )
३. क्रांति ( पूज्य साने गुरुजींच्या पुस्तकाची विद्यार्थी आवृत्ति )
४. भारताच्या इतिहासांतील थोरांच्या कथा ( गोष्टी )
५. साने गुरुजी यांचें चरित्र.

## आगामी

१. वामन गुरुजी ( कथा )
२. निबंध आणि लेखन.
३. सागराच्या लाटा. ( कविता )
४. महात्मा गांधी ( विद्यार्थ्यांसाठीं चरित्र )

IRBK-0103270
IRBK-0103270

# आमचें प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| सुंदर कथा | सानेगुरुजी | ०—६ |
| क्रांति–( संक्षिप्त आवृत्ति ) | ,, | १—८ |
| मुलांसाठीं फुलें–( कथा ) | ,, | ०—६ |
| इतिहासाचार्य राजवाडे ( चरित्र ) | ,, | १—८ |
| ईश्वरचंद्र विद्यासागर ,, | ,, | १—८ |
| मृगाजिन ( सानेगुरुजींच्या आठवणी ) | | १—८ |
| मराठीचिये नगरीं ( द. रा. कानेगांवकर ) | | १—८ |
| बालप्रदीप ( कथा ) यदुनाथ थत्ते | | ०—८ |
| आगरकर ( चरित्र ) पु. पां. गोखले | | ०— |
| जगांतील जमती सौ. मालतीबाई दांडेकर | | ०—१ |
| इसापच्या सहवासांत (कथा) त्र्यं. ग. बापट | | ०— |
| भारताच्या इतिहासांतील थोरांच्या कथा | | ०— |
| महागणपती कथा | ,, | ०— |

प्रकाशक

द. र. कोपर्डेकर

५२९ सदाशिव पेठ

पुणें २